**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 03.09.2025** **वार- बुधवार**

---

**ओबीसी उपसमिती**

ओबसी समाजाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राज्य मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यात येणार आहे. आज मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. अशा प्रकारची समिती स्थापन करण्याची जुनी मागणी होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**मंत्रिमंडळ निर्णय**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात 1 हजार रुपयांची वाढ करणं, तसंच महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील राखेच्या वापराबाबतचं धोरण निश्चित करण्याला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या बैठकीत पुणे मेट्रोवरील बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजूरी देण्यात आली. स्वारगेट ते

कात्रज मेट्रो मार्गावर बालाजीनगर आणि बिबवेवाडी ही दोन नवीन मेट्रो स्थानकं उभारण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पुणे ते लोणावळा उपनगरी रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिका प्रकल्प खर्चाची तरतूद करण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला.

**आदिवासी कार्यशाळा**

आदिवासी समाजासाठी तळागाळातील नेतृत्व घडवण्याकरता केंद्र शासनानं सुरू केलेल्या "आदी कर्मयोगी अभियाना" अंतर्गत पुणे जिल्ह्यात आज जिल्हास्तरीय मार्गदर्शन कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. आदिवासी नागरिकांमध्ये 17 विभागाच्या योजना पोहचविण्यासाठी प्रत्येक गटामध्ये 30 प्रशिक्षणार्थी तयार करण्यात आल्याचं यावेळी सांगण्यात आलं. शासकीय अधिकाऱ्यांना आदिकर्म योगी, युवक नेतृत्व, शिक्षक, डॉक्टर्स आणि समाज सेवकांना आदि सहयोगी तर आदिवासी नेते, स्वयंसेवक, बचत गटातील महिला हे आदि साथी म्हणून काम पाहणार आहेत. पुणे जिल्ह्यात विविध तालुक्यातील 99 गावं आदिवासी बहुल असून यातील लोकसंख्या 85 हजार 304 आहे.

**रब्बी**

गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस, करडई, मोहरी आणि सूर्यफूल या पिकांच्या उत्पादकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं 2025–26 च्या रब्बी हंगामासाठी पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांनी यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करावा, असं आवाहन पुणे जिल्हा कृषी विभागानं केलं आहे.

**गणेशोत्सव**

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये सध्या गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे. पुण्याच्या मध्य भागात विविध गणेश मंडळांच्या गणेशांचं दर्शन घेण्यासाठी तसंच मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयामार्फत एकत्रीत केलेल्या गणेश मूर्तींचं विसर्जन मोशी खाण इथल्या विसर्जन स्थळी करण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी काल या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. गणेश विसर्जन काळात कोणतीही गैरसोय होऊ नये, विसर्जन सोहळा सुरळीत आणि सुरक्षित पार पडावा, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश जांभळे पाटील यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**डेंगी**

पुणे शहर परिसरात पावसाळ्यात डेंगीच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ होते. जुलै महिन्यात शहरात डेंगीचे 11 रुग्ण आढळले होते, तर ऑगस्टमध्ये 28 रुग्णांची नोंद झाली आहे. याशिवाय संशयित रुग्णांची संख्या देखील झपाट्याने वाढली आहे. ऑगस्टमध्ये 747 संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे नागरिकांनी योग्य काळजी घ्यावी, परिसर स्वच्छ ठेवावा, पाणी साचू देऊ नये असं आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागानं केलं आहे.

**प्रभागरचना**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीच्या प्रारूप प्रभाग रचनेवर आतापर्यंत 1 हजार 382 हरकती आणि सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. काल एका दिवसात 785 हरकती दाखल झाल्या आहेत. 41 प्रभागांमधील 8 प्रभागांमध्ये एकही हरकत दाखल झालेली नाही. या हरकती आणि सूचना नोंदविण्यासाठी आता अवघ्या एका दिवसाची मुदत राहिली आहे.

**वायसीएम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाने आपत्कालीन विभागात अत्याधुनिक रुग्ण निवड आणि पुनर्जीवन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे आपत्कालीन सेवांना बळकटी मिळणार आहे. महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या नवीन सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. गंभीर रुग्णांना जलद, प्रणालीबद्ध आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्यासाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.

**पुरस्कार**

सोसायटी फॉर ऑटोमोटिव्ह इंजिनिअर्सच्या वतीने आयोजित 'सुप्रा एसएई इंडिया-2025' राष्ट्रीय स्पर्धेत पुणे विद्यार्थी गृहाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंटच्या 'मॅव्हेरिक' संघाने अभिमानास्पद कामगिरी करत देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या संघाने स्पर्धेत एकंदर पाच पारितोषिके मिळवली. 13 ते 16 ऑगस्ट या कालावधीत ही स्पर्धा नोएडामध्ये आयोजित करण्यात आली होती. देशभरातील आयआयटी, एनआयटीसह आघाडीच्या संस्थांचा यात सहभाग होता.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज वातावरण अंशतः ढगाळ होतं. आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 21 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**